# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १८ जुलै, २०२५ / आषाढ २७, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल मंत्री** | |
| **(२)** | **वने मंत्री** | |
| **(३)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(६)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(७)** | **मदत व पुनर्वसन मंत्री** | |
| **(८)** | **मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २६**

---

### पाचेगाव (ता.नेवासा, जि.अहिल्यानगर) येथे कपाशीच्या बियाणांच्या विक्रीमध्ये होत असलेला गैरव्यवहार

**(१) * १००९८ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचेगाव (ता.नेवासा, जि.अहिल्यानगर) येथे महिको कंपनीच्या एमआरसी ७३५१ या वाणाचा कपाशी बियाणांच्या विक्रीमध्ये गैरप्रकार झाल्यामुळे 'मे.त्रिमुर्ती ॲग्रो सर्व्हिसेस' या फर्मविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे दिनांक २६ मे, २०२५ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या तपासणीत महिको कंपनीचे कपाशीचे एमआरसी ७३९१ वाण अधिक दराने विक्री होत असल्याचे निदर्शनास आले असून शेतकऱ्यांकडील देयकाची तपासणी केली असता दुकानदाराने निर्धारित किंमतीपेक्षा अधिक दर आकारल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या दुकानाच्या तपासणीमध्ये खरेदी चलनावर कोणत्याही प्रकारचा बियाणे लॉट क्रमांक आढळला नसून दुकानातील साठा व भावफलक अद्ययावत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन बियाणे व खतांचा गैरव्यवहार तसेच शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये व शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाची खते व बियाणे मिळावेत याकरिता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) मे.त्रिमुर्ती ॲग्रो सर्व्हिसेस पाचेगाव, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर यांचा बियाणे विक्री परवाना व कापूस विक्री परवाना दिनांक २३.०६.२०२५ पासून कायमस्वरूपी रद्द करण्यात आलेले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात कृषी विभागामार्फत बियाणे कायद्यांतर्गत २ व खत नियंत्रण आदेश अंतर्गत ३ गुन्हे असे एकूण ५ गुन्हे दाखल केलेले असून एकूण रु.१२.३४ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. कायद्यांचे उल्लंघन केलेल्या ३५ निविष्ठा विक्री परवान्यावर निलंबन/रद्द ची कारवाई केली.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यात भूसंपादनात प्रकल्पबाधित आदिवासी कुटुंबांची झालेली आर्थिक फसवणूक

**(२) * १४०४७ श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात मुंबई अहमदाबाद अतिजलद रेल्वे महामार्गाच्या भूसंपादनात प्रकल्पबाधितांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, झरी (धांगडपाडा) (ता.तलासरी) येथील एका आदिवासी कुटुंबाची सुमारे दीड कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला देण्यासह संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) झरी (धांगडपाडा) ता.तलासरी, जि.पालघर येथील श्री.बाबु रामा धांगडा यांना मालकीहक्काप्रमाणे (७/१२) सर्व्हे नं.२५७/१ ह्या जमिनीचा मोबदला स्विकारण्यासाठी नोटीस देऊनही ते हजर होत नाहीत किंवा त्यांनी बँकेचे खाते क्रमांक न दिल्याने रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करता येत नाही. त्यामुळे सदरची रक्कम भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदीनुसार भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, संभाजीनगर येथे जमा करण्याची तजविज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मलजल वाहिन्या व मैला टाक्या रोबोटद्वारे साफ करण्याबाबत

**(३) * ७३७४ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने हाताने मैला साफ करण्यावर बंदी घातलेली असताना, अद्यापही राज्यातील विविध ठिकाणी मॅनहोल, मलजल वाहिन्या व मैला साफ करण्याचे काम सफाई कर्मचाऱ्यांकडून हातानेच करवून घेतले जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामे बहुतेक वेळा अनसूचित जाती व इतर मागास जातीमधील तसेच सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या व्यक्तींनाच दिली जात असल्यामुळे सामाजिक भेदाभेद व जातीआधारित शोषण कायम राहत असून त्यामुळे घटनात्मक अधिकारांचा भंग होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सन २०१८ मध्ये केलेल्या सर्व्हेक्षणामध्ये ७ हजार ३७८ कर्मचारी हाताने मैला उचलत असल्याचे निदर्शनास आले असून सन २०२१ ते २०२४ या वर्षात परभणी, मुंबई शहर, सातारा, ठाणे, पुणे येथील मैलाटाकी व मलजल वाहिन्या साफ करताना १८ सफाई कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात सन १९९३ ते २०२२ पर्यंत ३९ सफाई कर्मचाऱ्यांचे मैलासाफ करताना अपघाती मृत्यू झाले असून त्यापैकी केवळ १९ मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना तुटपुंजी आर्थिक मदत मिळाल्याचे राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाच्या अहवालातून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार हाताने मैला उचलण्यावर बंदी घालून रोबोटद्वारे मलजल वाहिन्या आणि मैला टाक्या साफ करण्याच्या अनुषंगाने वा इतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासंदर्भात तसेच मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ (एनएसकेएफडीसी), नवी दिल्ली यांनी सन २०१८ मध्ये केलेल्या सर्व्हेक्षणात एकूण ७३७८ लोकांनी मॅन्युअल स्कॅव्हेंजर्सचे काम करत असल्याचे स्वयंघोषित अर्ज भरुन दिलेले असून त्यापैकी एकूण ६३२४ व्यक्तींच्या बँक खात्यामध्ये एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांचेकडून रु.४०,०००/- इतकी रक्कम जमा करण्यात आलेली आहे.

तसेच, सन २०२१ ते २०२४ मध्ये मैला टाकी व मलजल वाहिन्या सफाई करताना परभणी जिल्ह्यात ०५, सातारा जिल्ह्यात ०१, पुणे जिल्ह्यात १०, ठाणे जिल्ह्यात ०२ आणि मुंबई शहरात ० याप्रमाणे १८ व्यक्ती मयत झाले असल्याचे आढळून आले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) मैला टाकी व मलजल वाहिन्या साफ करताना अपघाती मृत्यूप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलिसांमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

नगरविकास विभागाच्या दिनांक ०५.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये व दिनांक ०३.०५.२०२४ च्या परिपत्रकान्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सेप्टीक टँक, भूमीगत गटारे इत्यादींची साफसफाई केवळ यांत्रिकी पध्दतीने अथवा मशीनद्वारे करण्याबाबत सूचना निर्गमित केल्या असून केवळ अपरिहार्य परिस्थितीतच कामगारांमार्फत साफसफाई करण्यात यावी, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या (मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स) कल्याणासाठी "मॅनहोलकडून मशिनहोलकडे" ही योजना राबविण्यास या विभागाच्या दिनांक १६.३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तथापि, सदर योजनेची अंमलबजावणी नगरविकास विभागामार्फत करण्याचा झालेला निर्णय पाहता नगरविकास विभागाकडून त्यांच्या दिनांक ०४.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. प्रस्तुत प्रयोजनार्थ रु.१०० कोटी इतका निधी नगरविकास विभागास उपलब्ध करुन दिला असून राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ४१४ सक्शन कम जेटींग वाहने खरेदी करण्याची प्रक्रिया नगर विकास विभागाकडून सुरु करण्यात आली आहे.

सन १९९३ ते सन २०२२ पर्यंत एकूण ७८ व्यक्ती मृत पावलेल्या असून त्यापैकी ७४ व्यक्तींच्या वारसांना या विभागाच्या दिनांक १२.१२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे. तथापि, ४ प्रकरणात वारस उपलब्ध नसल्याने व मृत व्यक्ती मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स नसल्याने नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली नाही.

मयत मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स यांच्या वारसांना नुकसान भरपाई देण्याबाबत या विभागाच्या दिनांक ३०.०४.२०२५ रोजीच्या सुधारित शासन निर्णयानुसार मृत्यूप्रकरणी रु.१० लाख ऐवजी रु.३० लाख इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात येणार असून कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास रु.२० लाख व अपंगत्व आल्यास रु.१० लाख इतकी नुकसान भरपाई देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील सर्व वन्य प्राण्यांना उन्हाळ्यात पाणी पिण्यासाठी पाणवठे निर्माण करण्याबाबत**

**(४) * १४४३२ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील वन्य प्राण्यांसाठी वन विभागाने पाणवठे केले नसल्याने पाण्यासाठी वन्य प्राण्यांना भटकंती करावी लागत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील मरवडे व भालेवाडी परिसरात मोठ्या प्रमाणात वन्यप्राणी असल्याने त्यांना पाहण्यासाठी पर्यटकांना जीव धोक्यात घालावा लागत असून याकडे वन विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व वन्य प्राण्यांकरिता पाणवठे निर्माण करण्याबाबत व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) मंगळवेढा तालुक्यामधील पंढरपूर वनपरिक्षेत्रांतर्गत (जि.सोलापूर) वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरिता २४ कृत्रिम पाणवठ्यांची निर्मिती करण्यात आली आहे. सदर पाणवठ्यांमध्ये विशेषत: माहे जानेवारी ते माहे मे या कालावधीत पाणी उपलब्ध व्हावे याकरिता जिल्हा वार्षिक योजना तसेच विविध NGO/CSR यांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधीमधून सदर पाणवठ्यांमध्ये पाणी पुरविण्याचे काम करण्यात येते.

(२), (३) व (४) मंगळवेढा तालुक्यामधील पंढरपूर वनपरिक्षेत्रांतर्गत (जि.सोलापूर) मौजे-मरवडे या गावामध्ये १५ हेक्टर वनक्षेत्र असून, सदर क्षेत्रातील वन्यप्राण्यांना पाहण्यासाठी पर्यटक जीव धोक्यात घालत असल्याची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

-----------------

**राज्यातील आश्रमशाळांच्या झालेल्या दुरवस्थेबाबत**

**(५) * ७३४१ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या आदिवासी विकास मंत्रालय व भारतीय गुणवत्ता परिषद यांनी मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र आणि ओडिशा या पाच राज्यातील ३०० आदिवासी आश्रमशाळांमधील मुलभूत सोयी-सुविधांचे सर्व्हेक्षण केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सर्व्हेक्षणांतर्गत महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील ३५ आदिवासी आश्रमशाळांचे सर्व्हेक्षण करण्यात आले असून सदर शाळांमधील २०% शाळांच्या इमारतींची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त जिल्ह्यातील ५७.१ % शाळांमध्ये फर्निचर कमी असल्याचे तसेच एक-तृतीयांश शाळांमध्ये ४० विद्यार्थ्यांसाठी केवळ एकच स्वच्छतागृह असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आश्रमशाळांच्या दुरुस्तीसह तेथे आवश्यक सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१), (२) व (३) जनजातीय कार्य मंत्रालय, भारत सरकार यांनी मे, २०२४ मध्ये राज्यातील पालघर जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळांची पाहणी करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण व प्रशिक्षण मान्यता मंडळाचे पथक पाठविले होते. सदर पथकाने पालघर जिल्ह्यातील डहाणू प्रकल्पांतर्गत २१ व जव्हार प्रकल्पांतर्गत १४ अशा एकूण ३५ शासकीय आश्रमशाळांची पाहणी केली.

जनजातीय कार्य मंत्रालयाने अद्यापपर्यंत राज्य शासनाला या संदर्भात अहवाल पाठविला नाही अथवा कोणतेही निर्देश दिलेले नाहीत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(६) * १३८६४ श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कापूस उत्पादकांसाठी असलेला बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट कॉटन) प्रकल्प दिनांक ३० जून, २०२५ पासून पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महत्त्वाकांक्षी प्रकल्प १३ जिल्ह्यांमध्ये लागू असतानाही ५ जिल्हे वगळल्याने तसेच सदर प्रकल्प पूर्णपणे बंद झाल्यास राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर आणि ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधीवर परिणाम होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, कापसाची गुणवत्ता राखणे व ग्रामीण युवकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सदर प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या प्रकल्पात आवश्यक सुधारणा करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०२१ ते २४ या कालावधीत प्रकल्पातील उपक्रमांचा सहभागी शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. तथापि, प्रकल्पातील घटकांच्या अनुदानासाठीचा खर्च व अंमलबजावणी यंत्रणावरील आस्थापना खर्चाच्या प्रमाणात कापूस गाठी रूपांतरण अत्यल्प म्हणजेच एकूण सहभागी शेतकरी संख्येच्या तुलनेत कापूस गाठी प्रक्रियेत शेतकरी सहभागाची टक्केवारी १ ते १.५ % व वार्षिक लक्षांक १ लाख गाठीचे असताना चार वर्षाच्या कालावधीत प्रागतिक कापूस गाठी निर्मिती केवळ ९४५४ इतक्याच होऊ शकल्या. उद्दिष्टांच्या तुलनेत प्रकल्प लाभांकित होत नसल्यामुळे उदिष्टपूर्ती अभावी पुढे न राबविण्याचा निर्णय झाला आहे.

(३) हे खरे नाही.

उप-प्रकल्पाची अंमलबजावणी निश्चित उद्दिष्टांनुसार व निर्धारित कार्यपद्धतीनुसार करण्यात आली आहे. यामध्ये सन २०२१ ते २०२५ या कालावधीमध्ये समाविष्ट जिल्ह्यांतील ७५०६५ शेतकऱ्यांना पिक प्रत्याक्षिक तांत्रिक सहाय्य, शेतकरी प्रशिक्षण, गट प्रवर्तकांसाठी प्रशिक्षणासह अभ्यासदौरे, शेतीशाळा व गट/एफपीओंना बाजार आधारित सुलभता येण्यासाठी बाजार संमेलन यांसारख्या विविध घटकांचा लाभ देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे अंमलबजावणी झाली असून शेतकऱ्यांना लाभ झाला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यात विनापरवाना सुरू असलेल्या विटभट्टी कारखान्यांबाबत

**(७) * ९७५० श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील विटभट्टी निर्मिती करणाऱ्या कारखान्यांच्या परवान्याची मुदत संपली असतानाही सदर विट मालकांकडून विनापरवाना विट निर्मिती केली जात असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विट निर्मितीच्या कारखान्यांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विटांसाठी बेकायदेशीर माती उत्खनन करण्यात येत असल्याने शासनाचा महसूल बुडत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) तहसील, पुसद कार्यालयामार्फत मंजूर खाणकाम आराखड्यातून एकूण ४८ विटभट्टी व्यावसायिकांना विटभट्टीकरीता माती उत्खननाची परवानगी देण्यात आली आहे. दिलेल्या मातीच्या परवान्या मधून तयार केलेल्या पक्क्या विटांची निर्मिती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियमन मंडळाच्या दिनांक २६.०८.२०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार जे विटभट्टीधारक ९ X ४ X ३ इंच आकारांच्या एकावेळी २५,००० नगांपेक्षा जास्त विटांची निर्मिती करतात तसेच ९ X ४ X ३ इंच आकारांच्या एकावेळी ५०,००० नगांपेक्षा जास्त विटांची निर्मिती करतात अशा विटभट्टीधारकांनी महाराष्ट्र प्रदूषण

नियमन मंडळाचेच संमतीपत्र घेणे बंधनकारक आहे. त्यापेक्षा कमी विटांची निर्मिती करतात अशा विटभट्टीधारकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियमन मंडळाचे संमतीपत्र घेणे बंधनकारक नाही.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर कार्यालयाकडे विटभट्टी कारखान्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत तक्रार अर्ज प्राप्त झालेला नाही.

तालुका आरोग्य अधिकारी, पुसद यांच्या अहवालानुसार विटभट्टी असलेल्या गावातील नागरिकांच्या आरोग्यावर प्रदूषणामुळे विपरित परिणाम झाल्याचे आढळून आले नाही व प्रदूषणामुळे आरोग्यावर परिणाम झाल्याची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) १५ प्रकरण मातीची अवैध गौण खनिज वाहतूक करताना आढळून आलेली आहेत. सदर १५ प्रकरणात रक्कम रू.१२,६२,६१८/- दंडाची आकारणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी रक्कम रू.८,९२,५१७/- वसूली करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील विमानतळ परिसरातील गावांमध्ये बोगस दस्तनोंदणी होत असल्याबाबत

**(८) * १४०४० डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात प्रस्तावित असलेल्या नवीन विमानतळामुळे जमिनीचे भाव वाढले असल्याने मागील काही महिन्यांपासून विमानतळ परिसरातील गावांमध्ये बोगस दस्तनोंदणी होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट कागदपत्रांद्वारे नव्या खरेदीदाराचे नाव अधिकाऱ्यांच्या संगनमताने सातबारा उताऱ्यावर लावण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी किती गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे व त्याचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अशंत खरे आहे.

दुय्यम निबंधक श्रेणी-१, पुरंदर यांच्या कार्यालयात माहे मार्च, २०२५ मध्ये मौजे खानवडी येथील शेतजमिनीचे साठेखत २५०१/२२५ या क्रमांकाने मूळ मालकाऐवजी नोंदणीकृत झालेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) चौकशी दरम्यान मूळ व्यक्ती ऐवजी बनावट व्यक्ती असल्याचे स्पष्ट झाल्याने दुय्यम निबंधक पुरंदर यांचेकडून नोंदणी अधिनियम, १९०८ चे कलम ८२ नुसार कारवाई करण्यासाठी सासवड पोलीस स्टेशन यांना दिनांक ७/६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे चिकलठाणा (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथील अतिक्रमण केलेली शासकीय गायरान जमीन नियमानुकूल केल्याबाबत

**(९) * ११६८७ श्री.विलास भुमरे (पैठण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिकलठाणा (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथील गट नंबर २४२ मधील १ हेक्टर शासकीय गायरान जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अतिक्रमित गायरान जमीन शेती प्रयोजनाकरिता नियमानुकूल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी महसूल विभागाचे शा.नि.क्र.जमीन ०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१, दिनांक १२ जुलै, २०११ च्या विरोधात संगनमताने अतिक्रमित जमीन नियमानुकूल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) श्रीमती सुभद्रा बनकर यांनी जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दिनांक ०८.०८.२०२४ रोजी शेतजमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत अर्ज सादर केला आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक २७/०३/२०२५ रोजीच्या आदेशान्वये मौजे चिकलठाणा, ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट नं.२४२ मधील क्षेत्र १ हे. शेतीसाठीचे अतिक्रमण अटी व शर्तींच्या अधिन राहून नियमानुकूल केले आहे.

तथापि, दिनांक २७/०३/२०२५ रोजीच्या आदेशास जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १३/०६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे व फेरचौकशी बाबतची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोहले (ता.कोरची, जि.गडचिरोली) येथील लोहखाण प्रकल्पासाठी अनेक औषधी गुणधर्म असणाऱ्या झाडांची कत्तल थांबविण्याबाबत

**(१०) * १४६१८ श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोहले (ता.कोरची, जि.गडचिरोली) येथील लोहखाण प्रकल्पास सुरुवात झाली असून लोहखनिज काढण्याकरीता रस्ता तयार करण्यासाठी २२ हजार झाडांची कत्तल करण्यात येणार असल्याने तेथील नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधी यांचाही विरोध असल्याचे दिनांक १६ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या प्रकल्पाच्या कंत्राटदाराने काही लोकांच्या खाजगी जमिनी भाड्याने घेऊन अनेक औषधी गुणधर्म असणाऱ्या शेकडो झाडांची कत्तल केली असून याकडे वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी कत्तल करण्यात आलेल्या झाडांसंदर्भात चौकशी करण्याचे आदेश संबंधित विभागांना देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर झाडांची कत्तल रोखण्यासह दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) मौजे सोहले, ता.कोरची, जि.गडचिरोली येथील लोहखनिज काढण्याकरीता रस्ता तयार करण्यासाठी झाडांची कत्तल करण्यात येणार असल्याने तेथील नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा विरोध असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती (जि.अमरावती) शहरातील विकासकाने शेतकऱ्यांकडून घेतलेल्या जमिनी अकृषक न करता विक्री केल्याबाबत

**(११)** * **१२९२४ श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती (जि.अमरावती) शहरातील पश्चिम भागात विकासकाने शेतकऱ्यांकडून कृषक जमिनी घेऊन त्या जमिनीचे तुकडे पाडून अकृषक न करता परस्पर भूखंड विक्री करुन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत तहसीलदार, अमरावती यांनी दिनांक १३ मे, २०२५ रोजी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाची व सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक करणाऱ्या विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) श्री.शफिक राजा यांनी त्यांच्या दिनांक २१.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अमरावती शहरात जमिनी अकृषक न करता परस्पर भूखंड विकून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविण्यात आल्याची तक्रार दाखल केली असल्याचे दिसून येत आहे.
(२) होय, हे खरे आहे.

श्री.शफीक राजा यांची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्याकडून तहसीलदार, अमरावती यांचेकडे पाठविण्यात आली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसीलदार, अमरावती यांनी दिनांक १३.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, अमरावती यांना मार्गदर्शन मिळण्याबाबतची विनंती केली होती. परंतु, त्यासोबत वस्तुस्थितीदर्शक अहवाल प्राप्त न झाल्याने, वस्तुस्थितीदर्शक चौकशी करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, अमरावती यांनी तहसीलदार, अमरावती यांना दिनांक २६.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(३) याबाबत तहसीलदार, अमरावती यांनी दिनांक २७.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मंडळ अधिकारी यांचे पथक नेमून चौकशीची कार्यवाही सुरु केली आहे. तसेच विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या दिनांक ०९.०६.२०२५

रोजीच्या आदेशानुसार, सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरिता अपर जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत खाजगी पुरवठादार संस्थांनी केलेला गैरव्यवहार**

**(१२) * १२३०९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी विकास विभागामार्फत विविध योजनांच्या अंमलबजावणीत खाजगी पुरवठादार संस्थांनी मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त गैरप्रकार करणाऱ्या खाजगी पुरवठादार संस्थांना प्रतिबंधित करुन काळया यादीत टाकण्याचा निर्णय आदिवासी विकास विभागाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने मा.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीने १०५ खाजगी पुरवठादार संस्थांना काळया यादीत टाकण्याची शिफारस केली असतानाही त्यापैकी ३४ संस्थांना यादीतून वगळण्याचा निर्णय आदिवासी विकास विभागाने घेतल्याचे माहे मे, २०२५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा प्रकारचे गैरव्यवहार भविष्यात टाळण्यासाठी सदर संस्थांवर कार्यक्षमतेची अट घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू संस्थांकडून शासनाच्या निधीची वसुली करणे तसेच आदिवासी विभागाने घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय.
(२) दिनांक २२/०१/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये १०५ संस्थाना काळया यादीत टाकण्यात आले आहे.
(३) व (४) होय.

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांनी तपासणीअंती ज्या संस्थाबाबत योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या केल्याचे दिसून आले, वसूली निरंक आहे किंवा वसूलपात्र रकमेची वसूली झाली, FIR बाबत न्यायालयात अ/क समरी अहवाल दाखल झालेला आहे अशा संस्थाना काळया यादीतून वगळण्याची शिफारस शासनास केली होती. सदर शिफारस शासनाने स्विकारुन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून ३४ संस्थाना दिनांक २६/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये काळया यादीतून वगळले आहे.
(५) ३४ खाजगी पुरवठादार संस्थांपैकी ५ संस्थांकडून रु.३,८४,७४५/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित २९ संस्थांचे FIR प्रकरणात अ/क समरी अहवाल न्यायालयात दाखल झाला असून योजना राबविल्याबाबत पूर्ण दस्तऐवज उपलब्ध आहेत. सबब, उर्वरीत २९ संस्थांची वसूली निरंक आहे. त्यामुळे सदर निर्णयाचा फेरविचार करण्याची आवश्यकता नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील देवस्थानांच्या शेत जमिनीकरिता अँटी लॅन्ड ग्रॅबींग (प्रतिबंध) कायदा लागू करण्याबाबत

**(१३) * ७७८२ श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात व विशेषतः विदर्भातील अमरावती येथील सोमेश्वर व कालेश्वर देवस्थान तसेच अकोला येथील बालाजी देवस्थानची कोट्यवधी रुपयांची जमीन खूपच कमी भावाने विकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त देवस्थानांच्या शेत जमिनी बेकायदेशीररित्या ताब्यात घेणाऱ्यास प्रतिबंध घालण्यासाठी राज्य शासनाने अँटी लॅन्ड ग्रॅबींग (प्रतिबंध) कायदा लागू करावा, अशी मागणी विविध धार्मिक संस्थांचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधीनी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्याकडे माहे मार्च, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू देवस्थानच्या जमिनींचे संरक्षण न झाल्यास धार्मिक व सांस्कृतिक वारसा धोक्यात येऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गुजरात, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशासारख्या राज्यांमध्ये लॅन्ड ग्रॅबींग विरोधी कायदे लागू करण्यात आले आहेत व अशा कायद्यांमुळे जमीन बळकाविणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन देवस्थानांच्या जमिनी बेकायदेशीररीत्या ताब्यात घेणाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सोमेश्वर संस्थान, अमरावती मालकीचे शेत सर्व्हे नं.९४ क्षेत्र ४.८५ हे.आर. हे मुंबई कुळवहीवाट व शेत जमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८ चे कलम ४३ ते ५० मधील तरतुदीनुसार अर्जदार श्री.सुमन रामरतन कोठार यांना खरेदी करून देण्याबाबत तहसीलदार अमरावती यांनी दिनांक २६.०९.२०२४ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशाविरुध्द उप विभागीय अधिकारी, अमरावती यांचे न्यायालयात अपिल प्रलंबित आहे.

अकोला येथील बालाजी देवस्थान तसेच अमरावती येथील श्री.कालेश्वर देवस्थानच्या जमिनीबाबत हस्तांतरण झाल्याचे आढळून आले नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, अंशत: खरे आहे.

गुजरात राज्यामध्ये याबाबत "द गुजरात लँड ग्रॅबिंग (प्रोहिबिशन) ऍक्ट, २०२०" केला आहे.

(५) "जमीन-महसूलाच्या माफीबाबत (क्रमांक १) अधिनियम, १८६३" यामधील तरतुदीनुसार सर्वसाधारणत: धार्मिक किंवा धर्मदाय संस्थांनी धारण केलेल्या तसेच अशंत: व पूर्णत: सारामाफी असलेल्या जमिनीचे हस्तांतरण करता येत नाही.

त्यामुळे अशंत: व पूर्णत: सारामाफी असलेल्या देवस्थान इनाम जमिनी बेकायदेशीर आणि सक्षम प्राधिकारीच्या अथवा शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरीत झाल्या असल्यास त्या पूर्ववत देवस्थानांच्या नावे करण्याबाबत, महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक-डीईव्ही-२०१०/प्र.क्र.९/ल-४, दिनांक ३० जुलै, २०१०, शासन शुद्धीपत्रक दिनांक २९ जून, २०११ तसेच शासन परिपत्रक क्रमांक-डीईव्ही-२०१५/प्र.क्र.१५१/ ज-१अ, दिनांक ०६/११/२०१८ अन्वये पूर्ववत देवस्थानच्या नावे करण्याबाबत दिशा निर्देश देण्यात आले आहेत.

-----------------

## मौजे पाथर्डी (ता.जि.नाशिक) येथील तहसीलदार यांनी अधिकाराचा गैरवापर करुन मृत व्यक्तीस हयात असल्याचे दाखवून केलेला गैरव्यवहार

**(१४) * १४०२८ श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाथर्डी (ता.जि.नाशिक) येथील सर्व्हे नं.२०५/२/ प्लॅट नं.१ ते ३५ या मिळकतीचा भोगवटादार मालक मयत असताना व कार्यालयीन टिप्पणी मंजूर नसताना तहसीलदार, नाशिक यांनी अधिकाराचा गैरवापर करुन मृत व्यक्तीस हयात दाखवून दिनांक ७ ऑगस्ट, २०२४ रोजी आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ जून, २०२५ रोजी मयत व्यक्तीच्या मिळकतीबाबत तहसीलदार, नाशिक यांनी खोटे जबाब तयार करुन चौकशी न करता आर्थिक लाभापोटी चुकीचा अंमल दिल्याबाबत अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी यांच्या तक्रारीनुसार त्यांनी दिनांक ४ जून, २०२५ रोजी विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांना सदर विषयाबाबत तहसीलदार (नाशिक) यांची उच्च अधिकाऱ्यामार्फत सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार या प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) व (५) विभागीय आयुक्त, नाशिक यांनी तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणाची त्रयस्त उच्च अधिकारी यांचेमार्फत चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिलेल्या आहेत. त्यानुसार दिनांक २०/६/२०२५ अन्वये सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, दिंडोरी यांची नेमणूक करण्यात आली. उपविभागीय अधिकारी दिंडोरी यांनी दिनांक २५/६/२०२५ रोजी अहवाल सादर केला आहे. सदरचा अहवाल विचारात घेवून जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नाशिक तसेच अपर तहसीलदार नाशिक यांना याप्रकरणी निर्देश दिले आहेत. त्यानुसार सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नाशिक यांनी त्यांचेकडील आदेश दिनांक ३०/०६/२०२५ अन्वये अपिल क्र.०१/२०२५ कामकाजातुन काढून अपर तहसीलदार नाशिक यांना फेरचौकशी करण्याबाबत दिलेले निर्देश मागे घेतलेले असुन अपेलंट संस्थेने नाव साधर्म्याचा फायदा घेवून विषयांकित मिळकतीशी हितसंबंध दर्शवून प्रशासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्यामुळे संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत अपर तहसीलदार नाशिक यांना आदेश दिले आहेत. तसेच अपर तहसीलदार नाशिक यांनी त्यांचेकडील आदेश दिनांक ३०/०६/२०२५ अन्वये तहसीलदार नाशिक यांनी दिनांक ०७/०८/२०२४ रोजी पारित केलेला आदेश रद्द केलेला असून विषयांकित मिळकतीचे बेकायदेशीर हस्तांतरण होवू नये याकरिता सदर मिळकतीच्या इतर अधिकारात "सक्षम प्राधिकारी यांचे पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरणास बंदी" शेरा दाखल करण्याबाबत नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, दिंडोरी यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार विषयांकीत मिळकतीच्या अधिकार अभिलेखात संबंधित गृहनिर्माण सोसायटीचे नाव कमी करुन मयत व्यक्तीचे नाव दाखल करण्यात आल्याचे गंभीर बाब निदर्शनास आली असल्याने या अनियमितेस जबाबदार सर्व संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

-----------------

## वालिव्हरे (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील अनुदानित आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्याने गळफास लावून केलेली आत्महत्या

**(१५) * १२६७३ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वालिव्हरे (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील लोकसेवा शिक्षण संस्थेच्या अनुदानित आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थी श्री.सुभाष तुळजी रावते याने शाळेबाहेरील आंब्याच्या झाडाला गळफास लावून दिनांक १ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर विद्यार्थ्याच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या संस्थाचालक, मुख्याध्यापक व निवासी अधीक्षक यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणाची चौकशी करण्यात येऊन कर्तव्यात कसूर व हलगर्जीपणा केल्याप्रकरणी अनुदानित आश्रमशाळा, वालिव्हरे या शाळेचे माध्यमिक मुख्याध्यापक, प्राथमिक मुख्याध्यापक, अधीक्षक व संबंधित वर्गशिक्षक या कर्मचाऱ्यांना दिनांक ०५.०२.२०२५ पासून निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपळगांव (लिंगी) (ता.वाशी, जि.धाराशिव) येथील एका शेतकऱ्याच्या कुक्कुटपालन शेडमध्ये अवैध रासायनिक खतांचा साठा आढळल्याबाबत

**(१६) * १२९८१ डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगांव (लिंगी) (ता.वाशी, जि.धाराशिव) येथील ऐन खरिपावेळी एका शेतकऱ्याच्या कुक्कुटपालन शेडमध्ये अज्ञात व्यक्तीचा अवैध २० टन रासायनिक खतांचा साठा कृषी विभागाच्या भरारी पथकास आढळल्याचे दिनांक १७ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू माहितीच्या आधारे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्यासमवेत भरारी पथकासह कारवाई करुन ४५६ पोते रासायनिक खतांचा साठा जप्त करुन अनधिकृत खतांचे नमुने प्रयोगशाळेकडे पाठविले असता गुणवत्तेबाबत स्पष्ट अहवाल आला नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध २० टन रसायनिक खतांचा साठा आढळल्याने संबंधीत दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) दिनांक १५.५.२०२५ रोजी कृषी विभागाच्या भरारी पथकाने केलेल्या तपासणीत पिंपळगाव लिंगी, ता.वाशी येथील एका शेतकऱ्याच्या कुक्कुटपालन शेडमध्ये २०.२१५ मे. टन अनधिकृत रासायनिक खत साठा असल्याचे निदर्शनास आले.

(२) सदर रासायनिक खत साठ्याच्या नमुन्यांबाबत प्रयोगशाळेकडून अहवाल प्राप्त झाला आहे.

(३) सदर प्रकरणी संबंधित शेतकऱ्याकडे रासायनिक खतांचा अनधिकृत साठा सापडला असल्यामुळे त्यांचेवर व या प्रकरणात सहभागी असलेले त्यांचे आतेभावावर तालुका कृषि अधिकारी, वाशी यांनी रासायनिक खत नियंत्रण

आदेश, १९८५, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ व भारतीय न्यायसंहिता, २०२३ अंतर्गत दिनांक १६.०५.२०२५ रोजी फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. सदर प्रकरणी पोलीस यंत्रणेमार्फत पुढील कारवाई सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात झालेली अनियमितता**

**(१७)** * **८३०१ श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व इतर अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्याकरिता कृषी सचिव, श्री.रस्तोगी यांनी महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद (पुणे) यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय चौकशी समिती माहे मे, २०२५ मध्ये स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीने वित्तीय नियम व इतर नियमांचा भंग झाल्याबाबतचा अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत सुरु असलेल्या बांधकामांच्या कामांमध्ये अनियमितता झाल्या असल्याबाबत काही तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत.
(२) होय,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील विविध बांधकामांच्या कामाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरीता महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे.
(३) व (४) सदर चौकशी समितीने सादर केलेला अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. सदर अहवालाची छाननी करण्यात येत असून छाननीअंती अहवालातील निष्कर्षांच्या अनुषंगाने नियमोचित कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सडक अर्जुनी (जि.गोंदिया) तालुक्यात मोठ्या प्रमाणात होत असलेली अवैध वृक्षतोड**

**(१८)** * **१३९७३ श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सडक अर्जुनी (जि.गोंदिया) तालुक्यातील नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प क्षेत्राअंतर्गातील संपूर्ण तालुका इको सेन्सिटिव्ह झोन म्हणून घोषित असताना तेथील वनक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड सुरु असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वनक्षेत्रातील शेतशिवारालगत झुडपी जंगल, गायरान व पडीक जमिनीवर मौल्यवान वृक्षांची खसऱ्याच्या नावाने वृक्षतोड होत असताना त्याकडे वनविभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या नियमानुसार एक एकर क्षेत्रातील वृक्ष तोड करण्यासाठी किमान २५ जिवंत झाडे उभे असणे गरजेचे असतानाही शेतकऱ्यांची फसवणूक करुन लाकूड तस्कर संपूर्ण परिसरातील झाडांची कत्तल करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व प्रकारांची चौकशी करण्याची मागणी तेथील सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ यांनी राज्याचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांच्याकडे केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) सडक अर्जुनी (जि.गोंदिया) तालुक्यातील नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प क्षेत्राअंतर्गातील इको सेन्सिटिव्ह झोन क्षेत्रात माहे जानेवारी, २०२५ ते जून, २०२५ पर्यंत अवैध सागवान २० थुटांची संख्या आढळून आली असून त्याबाबत ४ वनगुन्ह्यांची नोंद करण्यात आलेली आहे.
(२) सडक अर्जुनी तालुक्यात शेतीशिवारालगत झुडपी जंगल, गायरान, पडीक जमिनीवर मौल्यवान वृक्षांची खसऱ्याच्या नावाने वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आले नाही. महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ नुसार माहे एप्रिल, २०२५ मध्ये एकूण १३ प्रकरणांमध्ये परवानगी देण्यात आलेली आहे.
(३) महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ नुसार अधिसूचित केलेल्या वृक्षतोडीस परवानगी दिली जाते. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (झाडे इत्यादींच्या हक्काचे नियमन) नियम, १९६७ नुसार बिगर अधिसूचित वृक्षांच्या वृक्षतोडीस परवानगी दिली जाते.
(४), (५) व (६) अशा प्रकारची कोणतीही तक्रार क्षेत्रीय कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही.

-----------------

## नायगाव (ता.वसई, जि.पालघर) येथील जलाशय भूमाफीयांनी बुजविल्याबाबत

**(१९)** * **७३९७ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील निसर्गरम्य ठिकाणी विविध प्रदेश भूमाफियांनी नष्ट केले असताना नायगाव पूर्वेतील एक मोठा जलाशय बुजविला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जलाशयाचे जतन व संवर्धन करण्याकरिता स्थानिक नागरिकांकडून मागणी करण्यात आली असताना उक्त जलाशय भरणी करून भूमाफीयांनी बुजविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मौजे जुचंद्र, ता.वसई, जि.पालघर येथील स.क्र.२९७/१/४, क्षेत्र ०.२३.३० हे.आर जमीन ही श्री.संदिप मणिलाल गोगरी यांची खाजगी मालकीची आहे. सदर जमीन खोलगट स्वरूपाची असल्याने, त्यामध्ये पावसाचे पाणी व लगतच्या इमारतीचे निचरा होऊन वाहून आलेले दूषित पाणी साचून राहिल्याने मच्छरांचा प्रादुर्भाव होत असल्याने आरोग्याचा प्रश्न उद्धवत होता. त्यामुळे जमीन मालकाने सदर जमिनीवर डेब्रीज (जुन्या इमारतीचा मलबा) टाकून सदरचा खड्डा बुजविला आहे.

सदरचा जलाशय हा नैसर्गिक नसून, पावसाचे पाणी व लगतच्या इमारतीच्या वाहून आलेल्या दूषित पाण्यामुळे तयार झालेला आहे. सदर स.क्र.२९७/१/४ ही जमीन खाजगी असून, जमिनीच्या ७/१२ सदरी अथवा शासनाने मंजूर केलेल्या विकास आराखड्यात जलाशयाची नोंद दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाला**
**निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२०) * १३५७४ श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊसतोड कामगारांसाठी शासनाकडून सन २०१९ मध्ये 'लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ' या महामंडळाची स्थापना केली असून या महामंडळास शासनाकडून निधी मिळाला नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ऊसतोड कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना, मुला-मुलींचे शासकीय वसतीगृह, परदेशी शिष्यवृत्ती, सुरक्षा साहित्य पुरवठा, तात्पुरती टेन्ट (झोपडी), इलेक्ट्रीक कोयता अशा विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२२ मधील शासन निर्णयानुसार साखर कारखान्यांनी दरवर्षी साखर गाळपाच्या प्रमाणात प्रति टन दहा रुपये महामंडळास देणे बंधनकारक असूनही राज्यातील साखर कारखान्यांनी सन २०२१-२२ मध्ये केवळ रु.१५५ कोटी ५६ लाख इतका निधी महामंडळास दिलेला असून पुढील तीन वर्षे साखर कारखान्यांनी निधी दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ऊस गाळपाच्या प्रमाणात रु.२८० कोटी ७७ लाख इतका निधी साखर कारखान्यांकडे थकीत असून शासन आणि साखर कारखाने यांच्याकडून निधी उपलब्ध होत नसल्यामुळे या महामंडळास ऊसतोड कामगारांसाठीच्या विविध योजना राबविता येत नसल्याचेही माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कामगारांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी उक्त महामंडळास निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

सन २०२१-२२ ते सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात लेखाशीर्ष २२३५ सी ५१९ अंतर्गत रु.८२.५२ कोटी निधी वितरित करण्यात आलेला आहे.

(२) होय हे खरे आहे.

राज्यातील ऊसतोड कामगारांसाठी विविध कल्याणकारी व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ देण्याकरिता गोपीनाथ ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची दिनांक १३/९/२०१९ रोजी स्थापना करण्यात आलेली आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

साखर कारखान्यांनी सन २०२१-२२ ते सन २०२३-२४ पर्यंत रु.११५.१६ कोटी इतका निधी महामंडळाच्या बँक खात्यात जमा केलेला आहे. उर्वरित अप्राप्त रक्कम साखर कारखान्यांकडून प्राप्त करुन घेण्याबाबत महामंडळाकडून पाठपुरावा सुरु आहे.

(५) दिनांक १६/२/२०२४ च्या शासन परिपत्रकानुसार मृत व जखमी ऊसतोड कामगारांच्या वारसांना रु.४६६.५० लक्ष इतके आर्थिक सहाय्य देण्यात आलेले आहे. ऊसतोड कामगारांसाठी दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सानुग्रह अनुदान योजना राबविण्यास मान्यता दिलेली असून त्यानुसार आतापर्यंत महामंडळामार्फत रु. २ कोटी ८३ लाख इतके सानुग्रह अनुदान वाटप केलेले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गासाठी भूसंपादन केलेल्या वनपट्टाधारक शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत

**(२१)** * **१४०८१ श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गासाठी तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील लाखनपाडा परिसरातील २० पेक्षा अधिक वनपट्टाधारक शेतकऱ्यांना ३ वर्षानंतरही मोबदला मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शेतकऱ्यांच्या वडिलोपार्जित जमिनीतील आंबा, चिकू, चिंच, काजू व खजुरी यासारख्या शेकडो झाडांची लागवड करण्यात आली असून कोणतीही पूर्वसूचना वा मोबदला न देता संबंधित ठेकेदाराने शेतकऱ्यांच्या जमिनीवर उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्यासह त्यांच्या इतर मागण्या मान्य न केल्यास आत्मदहन करण्याच्या इशारा शेतकऱ्यांनी माहे मे, २०२५ मध्ये शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यासह शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गासाठी करण्यात आलेल्या संयुक्त मोजणीनुसार तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील लाखनपाडा येथील वनपट्ट्याचे भूसंपादन झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गासाठी केलेल्या संयुक्त मोजणीत वनझाड कॉलममध्ये दर्शविण्यात आलेल्या १५ वृक्षधारकांना रु. ६१,२१,४९१/- एवढ्या रकमेचा निवाडा तयार करुन प्रकल्प संचालक राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. मंजुरी प्राप्त होताच मोबदला वाटप करण्यात येईल.

(३) असे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) उक्त २ येथे नमूद केल्याप्रमाणे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) येथील दुय्यम निबंधक यांनी नियमबाह्य पध्दतीने दस्त नोंदणी केल्याबाबत

**(२२) * ११०१४ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) येथील दुय्यम निबंधक हे नोंदणी महानिरीक्षक मुद्रांक व महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक १२ जुलै, २०२१ रोजीच्या परिपत्रकातील नियमांना बगल देऊन नियमबाह्य व चुकीच्या पध्दतीने दस्त नोंदणी केल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुय्यम निबंधक कार्यालय, मुखेड येथील दस्त नोंदणीची तपासणी करण्यासाठी पथक स्थापन करुन अहवाल सादर केला असून उपविभागीय अधिकारी, देगलूर यांच्या तपासणी अहवालानुसार दुय्यम निबंधक (मुखेड) यांनी मोठ्या प्रमाणात तुकडेबंदीचा भंग करुन अनियमितता केल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुय्यम निबंधक (मुखेड) यांनी शेत गट क्र.५२/अ या शेत जमिनीच्या बनावट कागदपत्रांच्या आधारे चारही चतुर्सिमा बदलण्यात आल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दुय्यम निबंधक (मुखेड) यांच्याविरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी (नांदेड) यांनी दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रान्वये आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलाबांची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) उपविभागीय अधिकारी देगलूर यांनी तपासणी अहवालानुसार ७० दस्त आक्षेपित दर्शविले होते. सदर अहवालास अनुसरुन जिल्हाधिकारी, नांदेड यांनी दिनांक १८.०८.२०२३ अन्वये अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. तद्नुसार उक्त ७० दस्तांची सह जिल्हा निबंधक वर्ग-१, नांदेड यांनी फेरतपासणी केली असता, ०९ दस्तांमध्ये आक्षेप मान्य करुन उर्वरित ६१ दस्तांमध्ये नोंदणी नियम, १९६१ चे नियम ४४ (ई) चा भंग झाला नसलेबाबत निदर्शनास आले. आक्षेपित दस्तांपैकी ६ दस्तांमध्ये महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१५ मधील कलम ८ ब चा भंग झालेला नाही. तसेच ४ दस्तांमध्ये ८ ब चा भंग झालेले दिसून आले. उक्त ४ आक्षेपित दस्त (दस्त क्र.२०९/२३, ५९१/२३, ६२८/२३) नोंदविलेले संबंधित श्री.बी.एस.उत्तरवार, सह दुय्यम निबंधक हे लाचलुचपत विभागाचे प्रकरणात निलंबीत असल्याचे, तसेच दस्त क्र.२२८/२३ बाबत संबंधित श्री.सी.एस.अंकाडे, कनिष्ठ लिपिक यांना समज देण्यात आलेली आहे.

तसेच गट क्र.५२/अ/१/१ या शेत जमीनीच्या चारही चतुर्सिमा बदलून चुक दुरुस्तीपत्राचा दस्तऐवज क्र.१९२३/२०२१ अन्वये नोंदणीकृत असून सदर प्रकरणात भौतिक बदल झाल्याचे निदर्शनास आल्याने त्यावर

कमी पडलेला मुद्रांक शुल्क, दंड व नोंदणी फी इत्यादी रक्कम वसूल करून शासनाकडे चलनाव्दारे जमा करण्यात आलेली असून कार्यवाही पूर्ण झाली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**धाराशिव (जि.धाराशिव) येथील जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यकाळात झालेला गैरव्यवहार**

**(२३) * १३३२२ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव (जि.धाराशिव) येथील श्री.शंकर तोटावार यांना गैरव्यवहारप्रकरणी निलंबित केले असतानाही अमरावती व नागपूर येथे विभागीय कृषी सहसंचालक या पदाचा अतिरिक्त पदभार तसेच वाशिम मुख्यालयात असताना आर्थिक देवाण-घेवाण करुन विभागीय कृषी सहसंचालक (अमरावती) या पदाचा अतिरिक्त पदभार घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) तसेच अमरावती विभागात वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या बदली व पदोन्नती प्रक्रियेत प्रशासन अधिकारी श्री.गजानन पाटील यांच्यासमवेत कोट्यवधी रुपये घेऊन गैरव्यवहार केला असल्याच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या असताना कृषी आयुक्तालयातील दक्षता पथकाने व आस्थापना शाखेने आर्थिक देवाण-घेवाण करून प्रशासन अधिकारी श्री.पाटील यांना संरक्षण देण्याकरिता संपूर्ण चौकशी / तक्रार प्रकरणे दडपली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री.तोटावार हे नागपूर विभागात चंद्रपूर येथे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व प्रभारी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (वर्धा) या पदावर कार्यरत असताना कृषी आयुक्तालयाच्या प्रस्तावाप्रमाणे श्री.मिलिंद शेंडे यांना विभागीय कृषी सहसंचालक (नागपूर) या पदाचा पदभार देण्याऐवजी तसेच तेथे इतर वरिष्ठ अधिकारी कार्यरत असताना देखील तेथील पदभार नियमबाह्य पद्धतीने घेतला होता, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच नागपूर विभागात वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या बदली व पदोन्नती प्रक्रियेत प्रशासन अधिकारी श्री.राजेश उंबरकर यांच्याशी संगनमत करुन कोट्यवधी रुपये घेऊन गैरव्यवहार केला असल्याबाबत अनेक तक्रारी शासनाकडे झाल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्री.तोटावार हे चंद्रपूर येथे कार्यरत असताना स्वतःच्या अधिकाराचा वापर करुन चौकशीची भिती दाखवून गैरमार्गाने पैसे काढण्यासाठी प्रशासकीय कारवाईची धमकी देत असल्याच्या काही तक्रारी कृषी आयुक्तालयाकडे पुराव्यासह आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन याबाबत कृषी आयुक्त व सचिव कृषी यांनी या संबंधित दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करुन फौजदारी कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीची कार्यवाही सुरू आहे.
(७) विलंब झालेला नाही.

-----------------

## कोडबाख हिंडी (ता.झरी जामणी, जि.यवतमाळ) या गावाजवळ मुरुमाचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(२४) * ९७८७ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोडबाख हिंडी (ता.झरी, जि.यवतमाळ) या गावाजवळ जेसीबीने मुरूमाचे उत्खनन करुन चार मोठ्या वाहनाने तेलंगणात अवैधरित्या वाहतूक सुरु असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा खनिकर्म विभागाने दिलेल्या परवान्याच्या तारखेत खाडाखोड करुन अवैधरित्या मुरुमाची तस्करी करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) तहसील कार्यालय झरी जामणी परिसरातील मुख्य रस्त्यावर संबंधित कंपनीच्या एकूण ०४ वाहनांमधून गिट्टी/खडीची (Processing Material) वाहतूक करताना आढळून आलेल्या वाहनांची वाहतूक पासची महाखनिज प्रणालीवर तपासणी करण्यात आली. त्यामध्ये सदर वाहनासोबत ३-३ ब्रासचे दोन परवाने स्कॅन करून दोन स्वतंत्र etp क्रमांक दोन वाहतूक परवान्यावर टाकण्यात आले. त्यामुळे एक परवाना वैध दाखवितो आणि एक परवाना Validity period exceeded असा दिसून आला आहे.

सदर वाहतूक पासच्या अनुषंगाने स्वामित्वधनाचा भरणा हा दिनांक २४.०४.२०२५ रोजी दिलेल्या तात्पुरत्या परवान्याच्या अनुषंगाने भरणा केला असल्याचे दिसून आले आहे. केवळ तांत्रिकज्ञानाच्या संबंधित सुपरवायझरच्या अभावामुळे यांनी एक etp जनरेट झाल्यानंतर दुसरा etp जनरेट केला आहे. या चुकीमुळे प्रत्येक वाहनासोबत जोडलेल्या दोन परवानापैकी एक Validity period exceeded दिसून आला आहे.

सदर वाहनांसोबत असलेल्या वाहतूक पासेस पाहता त्यावर खाडाखोड केली असल्याचे दिसून येत नाही.
(३) व (४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) तालुक्यात सामाजिक वनीकरण विभागासह रोजगार हमी योजनेच्या कामात अनियमितता झाल्याबाबत

**(२५) * ११०९७ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यात सामाजिक वनीकरण विभागासह रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्ष लागवड योजनेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर महामार्ग, राज्यमार्ग, पोचमार्ग याठिकाणी दुर्तर्फा वृक्ष लागवड केल्याबाबत खोटी कागदपत्रे सादर करणे, प्रत्यक्ष कामावर मजूर उपस्थित नसतानाही ऑनलाईन खोटी उपस्थिती दर्शविणे इ. गैरप्रकारांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वृक्ष लागवडीचे एकूण उद्दिष्टे, प्रत्यक्षात लावलेल्या वृक्षांची संख्या व वृक्षांचे संवर्धन करण्यात येत असलेली संख्या यात मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

सन २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीत सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड अंतर्गत मुखेड परिक्षेत्रामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) वृक्षलागवडीची कामे करण्यात आलेली नसून, सन २०२४-२५ मध्ये मनरेगा सोबत अभिसरणांतर्गत ०४ कि.मी. क्षेत्रावर रस्ता दुतर्फा वृक्ष लागवडीची ०२ कामे करण्यात आली आहेत.
(२) हे खरे नाही.

सदर रस्ता दुतर्फा वृक्ष लागवडीची कामे मनरेगासोबत अभिसरण (Top Up Model) करुन केलेली असून त्यामध्ये रोजगार सेवकाकडून ऑनलाईन हजेरी घेतल्यानंतरच जेवढे मजुर कामावर हजर होते, त्याच मजुरांचे मस्टर जनरेट करून मजुरी अदा करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.

सन २०२४-२५ या कालावधीत मनरेगासोबत अभिसरणांतर्गत मुखेड परिक्षेत्रास ०४ कि.मी. वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले होते व त्या उद्दिष्टाप्रमाणे ०४ कि.मी. मध्ये २००० रोपांची लागवड करण्यात आलेली आहे. त्यामुळे वृक्षांची संख्या व संवर्धन करण्यात येत असलेली संख्या यात तफावत आढळून येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक खाजगी कंपनीद्वारे केल्याबाबत

**(२६) * १३३६५ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनामार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या विभागात काम करण्यासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक एस टू इन्फोटेक या खाजगी कंपनीद्वारे केली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेच्या सर्व विभागात कंत्राटी कर्मचारी नेमणाऱ्या सर्व कंपन्या व त्या कंपनीला प्रत्येक कर्मचाऱ्यामागे दिलेल्या पगाराच्या १६% एवढे कमिशन दिले जात असून या कंपन्यांना शासनामार्फत कोट्यवधी रुपये मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती शासनाने स्थापन केलेल्या निधी असोसिएशनमार्फत करण्यात आल्यास कमिशनपोटी होणाऱ्या शासनाच्या कोट्यवधी रुपयांची बचत होणार असतानाही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाच्या निधीचे होणारे नुकसान टाळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.